MHPU250013742021

**फौ.कि.अर्ज क्र.२८७/२०२१ मधील निशाणी ५ वरील आदेश**

**१)** प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा कलम २३(२) नुसार अंतरिम आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदाराचा मुळ अर्ज प्रलंबित आहे.

**२)** अर्जदाराने मुळ अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण करणारा अधिनियमाच्या कलम १२ प्रमाणे दाखल केला आहे व त्यामध्ये कलम १८, १९, २०, २२ व २३ प्रमाणे आदेशांची मागणी केली आहे.

**३)** अर्जदाराचे मुळ अर्जात कथन आहे की, सामनेवाला क. १ हा अर्जदाराचा पती, क. २ हे सासरे, क. ३ ही सासू, क. ४ ही सामनेवाला क. २ ची बहिण, क. ५ ही सामनेवाला क. १ ची बहिण आणि क. ६ हा सामनेवाला क. ५ चा पती आहे. अर्जदार हिचा विवाह सामनेवाला क्र. १ याच्यासोबत ०६.१२.२०१९ रोजी झाला असुन त्यांचेतील विवाहसंबंध अद्याप कायम आहेत. तसेच अर्जदारास सदर लग्नसंबंधातून काहीएक अपत्य झालेले नाही. अर्जदाराच्या लग्नाचा खर्च अर्जदाराचे वडिलांनी करुन लग्नानंतर अर्जदार सामनेवाला यांचे घरी नांदावयास गेली असता, सामनेवाला यांनी तिला काही दिवस ब—यापैकी नांदवले. त्यानंतर सामनेवाला क. १ चे वागणे विक्षिप्त होवू लागले. सामनेवाला क. १ हा अर्जदारापासून वेगळा म्हणजेच सामनेवाला क. ४ सोबत वेगळया खोलीत झोपू लागला असता अर्जदाराने समजवण्याचा प्रयत्न केला, मात्र सामनेवाला हा अर्जदाराशी वाद करु लागल्याने अर्जदाराने सामनेवाला क. २ व ३ यांना विचारणा केली असता ते देखील अर्जदाराशी भांडण करु लागले. सामनेवाला क. १ ते ४ यांनी

अर्जदाराशी भांडण करुन, तिला मारहाण करुन, उपाशी ठेवून अर्जदाराचा छळ सुरु केला. सामनेवाला क्र. ५ व ६ हे देखील अर्जदाराचे सासरी येवून अन्य सामनेवाला यांचे कान भरुन अर्जदाराचा छळ करण्यास भाग पाडत होते. असे असतांनाही अर्जदार ही संसारापोटी सासरी राहत होती.

**४)** पुढे अर्जदाराचे मुळ अर्जातील कथनानुसार, सामनेवाला क्र. १ याने अर्जदारास लग्नात त्यांनी घातलेले दागिने मागितले असता, अर्जदाराने नकार दिला त्यावेळी सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी मोठया प्रमाणात भांडणे करुन अर्जदारास मारहाण केल्याने अर्जदाराने तिचे अंगावरील दागिने सामनेवाला क्र. १ ते ४ यांना दिले. त्यानंतर एके दिवशी सामनेवाला क्र. १ हा दारु पिवून घरी आला व अर्जदारास तिचे वडिलांकडून चार लाख रुपये घेवून ये अशी मागणी करुन तिला मारहाण करु लागला. त्यावेळी अर्जदाराने तिच्या आईवडिलांना झालेला प्रकार सांगितल्यानंतर अर्जदाराचे आईवडिलांनी तिचे सासरी येवून समजावण्याचा प्रयत्न केला असता, सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी अर्जदाराच्या आईवडिलांचा अपमान करुन त्यांना घरातून हुसकावून लावले.

**५)** पुढे अर्जदाराचे मुळ अर्जातील कथनानुसार, मे २०२० चे दरम्यान सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराकडे घटस्फोटासाठी तगादा लावला. त्यावेळी सामनेवाला क्र. ५ हिने अर्जदारास रॉकेल ओतून पेटवून दया असे सांगितले. त्याच दिवशी सामनेवाला क्र. १ याने काठीने व लाथाबुक्यांनी अर्जदारास मारहाण केली म्हणून अर्जदार हिने जुन्नर पोलिस ठाण्यात तक्रार केली असता, पोलिसांनी समजावल्याने पुन्हा सामनेवाला यांनी अर्जदारास सासरी नांदवायास नेले. मात्र, सामनेवाला यांचे स्वभावात कोणताही बदल झाला नाही. सामनेवाला क्र. १ ते ६ यांनी लग्न झाल्यापासून अर्जदारास मोठया प्रमाणात मानसिक व शारिरीक त्रास दिलेला आहे. त्यानंतरही सामनेवाला क्र. १ याने दारुचे नशेत अर्जदारास बेदम मारहाण केल्याने तिने

माहेरी घडलेला प्रकार सांगितला असता, अर्जदाराचे वडिल व मध्यस्थी लोकांनी सामनेवाला यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना न जुमानता घटस्फोटाची मागणी सामनेवाला क्र. १ याने केली.

**६)** पुढे अर्जदाराचे मुळ अर्जातील कथनानुसार, सामनेवाला क्र. १ याने मुद्दामहून खोटया मजकुराची नोटीस अर्जदाराचे आईवडिलांना दि.२०.११.२०२० रोजी पाठविली. सदर नोटीशीस अर्जदाराने दि.०२.१२.२०२० रोजी उत्तर दिले आहे. सामनेवाला यांचे छळामुळे अर्जदाराची तब्बेत खालावली असून सामनेवाला हे तिला दवाखान्यात नेत नसत. अर्जदार हिने मध्यस्थी व माहेरचे लोकांकडून चांगले नांदविण्यासाठी खुप प्रयत्न केले मात्र, सामनेवाला यांनी त्यास कोणताही प्रतिसाद न देता घटस्फोटाची मागणी केली. त्यानंतर दि. ०४.०६.२०२१ रोजी सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराला शिवीगाळ व मारहाण करुन नेसत्या वस्त्रानिशी घरातून हाकलून दिले असून तेव्हापासून अर्जदार ही माहेरी आश्रयतासारखे जीवन जगत आहे. सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदाराच्या अन्नवस्त्राची अगर औषधपाण्याची कोणतीही चौकशी केलेली नाही.

**७)** पुढे अर्जदाराचे मुळ अर्जातील कथनानुसार, सामनेवाला क्र. १ यांची जुन्नर शहरात अमित किराणा जनरल स्टोअर्स व अमित जनरल स्टोअर्स अशी दोन मोठी दुकाने असून बुधवार पेठ जुन्नर येथे पिठाची गिरणी आहे. सदर व्यवसायातून सामनेवाला यास वर्षाकाठी १५ ते २० लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला यांचा नारायणगाव येथे फलॅट असून त्याचे वर्षाला चार ते पाच लाख रुपये उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र. २, ३ व ४ हे सेवानिवृत्त असून त्यांना वर्षाकाठी १० ते १५ लाख रुपये पेंशन मिळते. सामनेवाला यांचे कुटूंब आर्थिकदृष्टया सधन असून त्यांची पोटगी अथवा नुकसान भरपाई देण्याची ऐपत आहे. सामनेवाला यांनी स्वत:हून अर्जदार हिला तिचे मर्जीविरुध्द नाकारलेले असल्याने तसेच अर्जदाराला स्वत:चे

उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने स्वत:चा उदरनिर्वाह चालविणे अशक्य होत आहे. त्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज तिचे अन्नवस्त्र व औषधपाणी याचा खर्च म्हणून दरमहा रु.२०,०००/— अंतरिम पोटगी मुळ अर्जाचे निर्णयापर्यंत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

८) सामनेवाला यांनी निशाणी १२ प्रमाणे त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी नातेसंबंध मान्य करुन इतर मजकुर नाकारलेला आहे. सामनेवाला यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह दि. ०६.१२.२०१९ रोजी झालेला असून सदरचा विवाह विशेष विवाह अधिनियम, १९५४ प्रमाणे विवाह अधिकारी, पुणे यांचेसमक्ष नोंदविण्यात आलेला आहे. सदर विवाहाचा संपुर्ण खर्च सामनेवाला यांचे कुटूंबाने केला असून सदर विवाहातून अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांना कोणतेही अपत्य नाही. अर्जदार ही सामनेवाला यांचे कुटूंबात जेमतेम आठ दिवस व्यवस्थित राहिल्यानंतर अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ याचे वयस्कर आईवडिलांना टोचून बोलणे, माहेरच्या मंडळींशी तासनतास फोनवर बोलणे, वेळेवर स्वयंपाक न करणे अशाप्रकारे वागू लागल्याने सामनेवाला क्र. ३ हिला घरातील सर्व कामे करावी लागत असे.

९) पुढे सामनेवाला यांचे म्हणण्यानुसार, दि. २४.१२.२०१९ रोजी अर्जदार सामनेवाला क्र. १ सोबत भाचीचे वाढदिवसाकरीता पुणे येथे गेले असता किरकोळ कारणावरुन वाद करुन न जेवता सामनेवाला क्र. १ सोबत जुन्नर येथे आली. त्यानंतरही सतत अर्जदार काहीना काही कारणावरुन सामनेवाला व त्याचे आईवडिलांशी भांडणतंटा करत सामनेवालाच्या कुवतीच्या बाहेरच्या मागण्या करीत असे. अर्जदार हिने लग्नात सामनेवाला याचे आईवडिलांनी केलेले ६ तोळयाचे दागिने माहेरी घेवून गेली आहे. मार्च २०२० पासून कोरोनामुळे सामनेवाला बेरोजगार असल्याने त्याला अर्जदार हिच्या इच्छा पुर्ण करता आल्या नाहीत. अशावेळी सामनेवाला यास

साथ न देता, सामनेवाला याचे आईवडिलांशी उलट व अर्वाच्य भाषेत बोलून त्यांचा पाणउतारा करीत असे. सामनेवाला याचा आतेभाउ स्वप्नील सरजिने याने अर्जदाराचे वडिलांना अर्जदाराची समजुत काढण्याबाबत सांगितले असता, अर्जदाराचे वडिलांनी स्वप्नील व सामनेवाला यांचे कुटूंबियांना शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला.

**१०)** पुढे सामनेवाला यांचे म्हणण्यानुसार, दि.१५.११.२०२० रोजी अर्जदार हिला भाउबिजेकरीता माहेरी जावयाचे होते मात्र, सामनेवाला हे कामात व्यस्त असल्याने अर्जदारास एकटीलाच जाण्यास सांगितल्याचा राग येवून तिने सामनेवाला यास शिवीगाळ करुन त्याचे कानशिलात मारली. त्यावेळी अर्जदार हिने सामनेवाला याचे आईवडिलांना देखील शिवीगाळ करुन सामनेवाला क्र. ४ हिचे कानशिलात मारुन रागारागात बॅग भरुन चुलत भाउ व मोठया बहिणीसोबत माहेरी निघून गेली. त्यावेळी सामनेवाला याने अर्जदार हिचे वडिलांना फोनवरुन घडलेला प्रकार सांगितला असता, अर्जदाराचे वडिलांनी सामनेवाला यांना जिवे मारण्याची धमकी दिली.

**११)** पुढे सामनेवाला यांचे म्हणण्यानुसार, अर्जदार हिने विवाहापुर्वी ती अविवाहित असल्याचे सामनेवाला यांना सांगितले होते. तसेच विवाह नोंदणी अधिकारी यांचेकडे केलेल्या अर्जात देखील तीने अविवाहित असल्याचे नमुद करुन प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. मात्र, अर्जदार हिचा सदर विवाहापुर्वी वडगाव कांदळी, नगदवाडी येथील नितिन बढे या व्यक्तीसोबत सन २०१२ साली विवाह झालेला असून अद्याप कायदेशीररित्या घटस्फोट झाला नसल्याची धक्कादायक बातमी सामनेवाला याला समजल्यानंतर त्यांना फार मोठा धक्का बसला. अर्जदार व तिचे माहेरच्या लोकांनी सामनेवाला यांची फसवणूक करुन विश्वासघात केलेला आहे. अर्जदार हिचा प्रथम विवाहानंतर कायदेशीर मार्गाने घटस्फोट झालेला नसल्याने सदरचा विवाह हा कायदयाने निरर्थक असून अर्जदार ही

सामनेवाला क्र. १ यांची कायदेशीर पत्नी ठरत नाही. त्यामुळे अर्जदारास सामनेवाला क्र. १ यांचेकडून पोटगी मागण्याचा कोणताही कायदेशीर हक्क नाही.

**१२)** पुढे सामनेवाला यांचे म्हणण्यानुसार, अर्जदाराने खोटी माहिती देवून सामनेवाला क्र. १ याचेशी केलेला विवाह रदद्बातल करण्यासाठी दि. २१.११.२०२० रोजी अर्जदारास वकिलामार्फत नोटीस पाठविली असून अर्जदाराने दि. ०२.१२.२०२० रोजी उत्तरी नोटीस पाठविली आहे. सदर उत्तरी नोटीशीत अर्जदार हिने तिचे पुर्वीचा विवाह मान्य केलेला आहे. सदरची नोटीस मिळाल्यानंतर दि. २६.११.२०२० रोजी अर्जदार व तिचे माहेरील नातेवाईक असे सुमारे दहा ते पंधरा लोक सामनेवाला याचे घरी आले व त्यांनी अर्जदार हिचा पुर्वीचा विवाह मान्य करुन सामनेवाला यांना अर्जदार हिला जबरदस्तीने नांदवावेच लागेल अशी धमकी दिली. त्यानंतर सामनेवाला यांनी खेड येथील मा. अति. जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयात, मॅरेज पिटीशन क्र. ८/२०२० दाखल केला असून तो अद्याप प्रलंबित आहे. सदर अर्जाचे कामी अर्जदार हिने हजर होवून जबाब दाखल केला असून सदरचा जबाब व प्रस्तुतचा अर्ज यात भली मोठी तफावत आहे. त्याचप्रमाणे अर्जदार हिने दाखल केलेल्या खेड येथील मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांचे न्यायालयातील विवाह अर्ज क्र. ३१२/२०२१ मधील मजकुरात देखील सदर अर्जाचे दृष्टीने मोठी तफावत दिसून येते.

**१३)** पुढे सामनेवाला यांचे म्हणण्यानुसार, अर्जदार व तिचे माहेरच्या लोकांनी सामनेवाला याला मोठया प्रमाणात शारिरीक व मानसिक त्रास दिला असून कोणतेही कारण घडलेले नसतांना जुन्नर पोलिसांकडे बनावट घटनांच्या आधारे तक्रारी दाखल करुन सामनेवाला यांचेविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४९८—अ प्रमाणे खोटी तक्रार दाखल केली आहे. मुळत: अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह निरर्थक असल्याने अर्जदाराचा अर्ज

प्रथमदर्शनी फेटाळण्यास पात्र असून तो खर्चासह नामंजुर करावा अशी विनंती केली.

**१४)** दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे कामी दाखल केलेली कागदपत्रे वाचली.

**१५)** अर्जदारातर्फे युक्तीवादात असे कथन करण्यात आले की, सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जाचे कामी दिलेल्या म्हणण्यामध्ये सामनेवाला क्र. १ यांचा अर्जदाराशी झालेला विवाह स्पष्टपणे मान्य केलेला आहे. सामनेवाला यांचे म्हणण्यातील तक्रारी पाहता, सामनेवाला यांना योग्य त्या न्यायालयात सदर तक्रारीबाबत किंवा अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह निरर्थक असल्याबाबत दाद मागता येईल. अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज लांबणीवर टाकण्याच्या उददेशाने सामनेवाला यांनी कोणत्याही कागदोपत्री पुराव्याशिवाय अर्जदाराच्या प्रथम लग्नाची खोटी तक्रार म्हणण्यामध्ये करुन न्यायालयाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला आहे. सध्यस्थितीत, प्रस्तुतचा अंतरिम अर्ज गुणदोषांवर निर्गत करतेवेळी विवाहाचे वैधतेबाबत सामनेवाला यांना तक्रारी उपस्थित करण्याचा कायदयाने कोणताही हक्क अधिकार नाही. अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या तक्रारी ख—या स्वरुपाच्या असून सामनेवाला यांनी कोणत्याही कारणाशिवाय अर्जदार हिचा शारिरीक व मानसिक छळ करुन तिला सासरच्या घरातून हाकलून दिले आहे.

**१६)** पुढे युक्तीवाददरम्यान अर्जदारातर्फे असे कथन करण्यात आले की, सामनेवाला क्र. १ यांची जुन्नर शहरात अमित किराणा जनरल स्टोअर्स व अमित जनरल स्टोअर्स अशी दोन मोठी दुकाने असून बुधवार पेठ जुन्नर येथे पिठाची गिरण आहे. सदर व्यवसायातून सामनेवाला यास वर्षाकाठी १५ ते २० लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला यांचा

नारायणगाव येथे फ्लॅट असून त्याचे वर्षाला चार ते पाच लाख रुपये उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र. २, ३ व ४ हे सेवानिवृत्त असून त्यांना वर्षाकाठी १० ते १५ लाख रुपये पेंशन मिळते. सामनेवाला यांचे कुटूंब आर्थिकदृष्टया सधन असून त्यांची पोटगी अथवा नुकसान भरपाई देण्याची ऐपत आहे. त्यामुळे सामनेवाला क्र. १ यांची पोटगी देण्याची ऐपत असल्याने त्यांचेकडून अर्जदारास अन्नवस्त्र व औषधपाण्यासाठी रक्कम रु.२०,०००/— इतकी रक्कम दरमहा अर्ज दाखल तारखेपासून मिळावी अशी विनंती केली आहे.

**१७)** सदरकामी सामनेवाला यांचेतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादात त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जदाराने तिच्या मुळ अर्जात केलेल्या संपुर्ण तक्रारी खोटया, लबाडीच्या व काल्पनीक स्वरुपाच्या असून त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही. अर्जदार सदरकामी स्वच्छ हाताने व सर्व वस्तुस्थिती न्यायालयासमोर आणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला नाही. अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह नोंदणीकृत असून अर्जदार व तिचे माहेरचे लोकांनी सदर विवाहापुर्वी अर्जदार हिचा झालेला प्रथम विवाह सामनेवाला यांचेपासून लपवून त्यांची फसवणूक केलेली आहे. त्यामुळे सदरचा विवाह रदद् करण्याकरीता सामनेवाला यांनी पाठविलेल्या नोटीशीस अर्जदारातर्फे उत्तर देवून अर्जदार हिचा प्रथम विवाह मान्य केलेला आहे. सदर उत्तर नोटीशीत अर्जदार हिचा प्रथम विवाह संदर्भात घटस्फोट झाल्याचे नमुद केलेले असून त्याबाबत कोणताही आवश्यक कागदोपत्री पुरावा याकामी सादर केलेला नसल्याने अर्जदार ही सामनेवाला क्र. १ यांची कायदेशीर पत्नी ठरत नाही. त्याअनुषंगाने सदर सामनेवाला यांनी याकामी नि. १४ वरील अर्जदाराचे प्रथमविवाहाचा घटस्फोटाचा लेख सादर करण्याबाबत नोटीस वजा अर्ज दाखल केलेला असून अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह कायदेशीर ठरत नसल्याने अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली. जाबदेणार तर्फे सदर

युक्तीवादाच्या पुष्टयर्थ **ए.आय.आर.२०१४ सुप्रीम कोर्ट ३०९**, **२०१० ऑल एम.आर. (क्रि.) जर्नल १९३** तसेच **ए.आय.आर. ऑनलाईन २०१८ एम.पी. १२५२** व **ए.आय.आर. १९८८ सुप्रीम कोर्ट ६४४** हे मा. वरिष्ठ न्यायालयाचे न्यायनिवाडे दाखल केलेले आहेत. सदर न्यायनिवाडयानुसार अर्जदार हिचा प्रथम विवाह अस्तित्वात असतांना केलेला दुसरा विवाह हा कायदेशीर विवाह असल्याचे म्हणता येत नसल्याचे नमूद करुन पोटगी करता अर्ज दाखल करणारी महिला कायदेशीर पत्नी नसल्यास तिला पोटगी देता येणार नाही असा निर्वाळा दिल्याचा युक्तीवाद सादर केला आहे.

**१८)** सामनेवालातर्फे त्यांचे म्हणण्यामध्ये मांडण्यात आलेली महत्वाची तक्रार म्हणजेच अर्जदाराचा झालेला प्रथम विवाह याबाबत देखील कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल करण्यात आलेला नाही. सामनेवालातर्फे नि. १८ चे कागदयादीसोबत अर्जदार व सामनेवाला क्र. १ ची विवाहनोंदणी वेळेची प्रतिज्ञापत्रे याकामी सादर केलेली आहेत. सदरचे प्रतिज्ञापत्रात जरी अर्जदार हिने 'तिचा आजपर्यंत विवाह झालेला नाही तसेच हा प्रथम विवाह आहे' असे नमुद केले असले तरी सदरचे प्रतिज्ञापत्र हे प्रमाणीत नसून त्यावर विवाह अधिकारी पुणे यांचा किंवा त्यांचे कार्यालयाचा सही शिक्का नमुद नाही. त्यामुळे सदर कागदोपत्री पुरावा प्रथमदर्शनी सामनेवाला यांचे तक्रारीनुसार सबळ किंवा ठोस पुरावा असल्याचे दिसून येत नसून त्याबाबत साशंकता निर्माण होते.

**१९)** त्याचप्रमाणे सामनेवालातर्फे दाखल केलेल्या म्हणण्यात अर्जदाराच्या प्रथम विवाहाच्या अनुषंगाने नोटीस दि. २१.११.२०२० रोजी पाठविल्याचे व सदर नोटीस अर्जदाराने दि. ०२.१२.२०२० रोजी दिलेल्या उत्तरात प्रथम विवाह झाल्याचे व सदर विवाह बाबतीत घटस्फोट झाला असल्याचे अर्जदाराने कबूल केल्याची तक्रार करुन अर्जदार व सामनेवाला

क्र. १ यांचा विवाह निरर्थक (void) असल्याने अर्जदारास पोटगी मागता येणार नसल्याचे तक्रार सामनेवाला यांनी केली आहे. मात्र, अर्जदाराने कागदयादी नि. ०३ सोबत दाखल केलेली सामनेवाला यांची वर नमुद नोटीस व अर्जदाराने त्यास दिलेली उत्तर नोटीस यांचे बारकाईने अवलोकन करता, अर्जदार हिने तिचे उत्तर नोटीस पान क्र. ५ वरील वस्तुस्थितीमध्ये अर्जदाराचा या लग्नाचे पुर्वी विवाह झाल्याची कल्पना सामनेवाला यांना देवून घटस्फोटाचे लेखाची प्रत सामनेवाला यांना दिल्यानंतर सामनेवाला हे प्रस्तुत विवाहास तयार झाल्याचे नमुद केलेले आहे. परंतु सदरचा मजकुर सामनेवाला यास अमान्य असल्याचे किंवा त्याबाबत सामनेवाला यांनी पुन्हा नोटीस पाठवून आक्षेप घेतल्याचे आढळत नाही.

**२०)** याठिकाणी कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदयाचे अवलोकन केले असता कलम २ मधील पीडित व्यक्तीची व्याख्या पाहता, **'पीडित महिला म्हणजे अशी कोणतीही महिला जी गैरअर्जदारासोबत कौटुंबिक नातेसंबंधामध्ये राहत आहे किंवा भुतकाळात राहत होती आणि जी महिला गैरअर्जदाराचे कोणतेही कृत्यामुळे कौटुंबिक हिंसाचारास बळी पडल्याचे कथन करत असेल अशा महिलेस पीडित म्हणता येईल'**. सदरची पीडित व्यक्तीची व्याख्या पाहता, पीडित व्यक्ती ही महिला असणे आवश्यक असून ती गैरअर्जदारासोबत केवळ कौटुंबिक नातेसंबंधामध्ये राहत असल्याचे किंवा राहिली असल्याचे पाहणे जरुरीचे आहे असे कायदयास अभिप्रेत असल्याचे दिसून येते.

**२१)** त्याचप्रमाणे सदर कायदयाचे कलम २ मधील कौटुंबिक नातेसंबंधाची व्याख्या पाहता, **'कौटुंबिक नातेसंबंध म्हणजे दोन व्यक्तींच्या मधील असे नातेसंबंध जे एकत्र राहतात किंवा कधीकाळी एकत्र एकाच घरामध्ये राहत होते आणि जेव्हा त्यांचेतील संबंध हे रक्ताचे, विवाहाचे किंवा विवाहासंदर्भाने जोडलेल्या नात्याचे, दत्तकाचे किंवा एकत्र कुटूंब म्हणून एकत्र राहणा—या कुटूंबातील**

**प्रत्येक सदस्याचे संबंध आहेत असे म्हणता येईल'**. सदरची कौटुंबिक नातेसंबंधाची व्याख्या पाहता, पीडित महिला ही केवळ वैध विवाहाच्या माध्यमातून गैरअर्जदारासोबत राहणे कायदयास अभिप्रेत नसून विवाह किंवा विवाहासारख्या स्वरुपाच्या कोणत्याही नातेसंबंधात राहत असणा—या महिलेस तिचेवर झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराबाबत सदर कायदयातील कलम १२ अन्वये दाद मागता येईल असे स्पष्ट होते.

**२२)** याठिकाणी अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह दि. ६/१२/२०१९ रोजी झाला असून त्यानंतर सुमारे ६ महिन्यांचे कालावधीनंतर अर्जदार ही जाबदेणार क्र. १ पासून विभक्त झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदरबाब जाबदेणार यांनी त्याचे बचावामध्ये कोठेही अमान्य केलेचे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदार व जाबदेणार यांचेतील कौटुंबिक नातेसंबंध याठिकाणी प्रथमदर्शनी शाबीत होतात. अर्जदाराचा जाबदेणार क्र. १ याचेशी झालेला विवाह वैध आहे किंवा अवैध आहे ही बाब दोन्ही बाजुंचा पुरावा न्यायालयासमोर आलेनंतर गुणदोषांवर ठरवणे न्यायोचित ठरणार आहे. सदयस्थितीत अर्जदार ही जाबदेणार क्र. १ याची पत्नी म्हणून त्याचे सोबत भूतकाळात एकत्र राहत असल्याचे व सध्या ती जाबदेणार क्र. १ पासून विभक्त राहत असून जाबदेणार क्र. १ हा अर्जदार हिचे चरितार्थाची व्यवस्था करत नाही इतकाच मुद्दा विचाराधीन घेणे आवश्यक ठरते.

**२३)** जाबदेणारतर्फे सदरकामी दाखल केलेले न्यायनिवाडे पाहता, सदरील सर्व न्यायनिवाडयामध्ये अर्जदार हिचा विवाह बेकायदेशीर असलेस तिला पोटगी मागता येत नसल्याचा निर्वाळा दिल्याचे स्पष्ट होते. सदरकामी अर्जदार हिचे विवाहाचे वैधतेबाबत दोन्ही बाजुंचा पुरावा समोर येईपर्यंत निष्कर्ष नोंदवणे न्यायोचित ठरणार नाही. त्यामुळे सदर निष्कर्षाच्या अनुषंगाने

जाबदेणारतर्फे दाखल करणेत आलेले न्यायनिवाडे याठिकाणी लागू होणार नाहीत.

**२४)** मुलत: याकामी अर्जदाराचा सामनेवाला याचेशी झालेल्या विवाहापुर्वी प्रथम विवाह होवून घटस्फोट झाला नसल्याची बाब सबळ तोंडी अथवा कागदोपत्री पुराव्याद्वारे प्रथमदर्शनी सामनेवाला यांनी शाबीत केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरची बाब प्रस्तुतचा अर्ज गुणदोषांवर चालवून, पुरावा घेवून अंतिमत: निकाली करतेवेळी ठरविणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होते.

**२५)** अर्जदाराने अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ शपथपत्र दाखल केले आहे. हे खरे आहे की, घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा कलम १३ प्रमाणे अंतरिम आदेश करता येतो. पंरतु याबाबत जरी सामनेवाला याने अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे नाकारलेले असले तरी त्यादृष्टीने याबाबत अभिलेखावर संरक्षण अधिकारी यांनी दाखल केलेल्या कौटूंबिक घटना अहवालाचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार झाल्याचे दिसून येते. तसेच सामनेवाला याने जरी अर्जदारास नांदण्यास येण्यासाठी स्वत: तसेच मध्यस्थांमार्फत अनेक प्रयत्न केले परंतु अर्जदाराने नांदण्यास येण्यास स्पष्ट नकार दिला असुन ती स्वइच्छेने माहेरी रहात आहे असे कथन केलेले असले तरी अर्जदाराने स्वत: सामनेवालाचा त्याग केला किंवा कसे ही बाब दोन्ही बाजूचा पुरावा घेवून गुणवत्तेवर ठरविणे आवश्यक आहे. परंतु सकृतदर्शनी अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा झालेला विवाह दोन्ही पक्षकारांना मान्य असून त्यांचेतील वैवाहिक संबंध अद्याप अस्तित्वात असूनही अर्जदार ही सामनेवालापासून स्वतंत्र रहात असून सामनेवालाने तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही काळजी घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत आर्थिक लाभाबाबत आदेश करणे उचित

होईल व सदर आदेशाकरीता दोन्ही बाजुंनी मांडलेले उत्पन्नाबाबतचे पुरावे विचाराधीन घेणे आवश्यक आहे.

**२६)** अर्जदार हिने तिचे मुळ अर्जात कौटूंबिक हिंसाचाराच्या घटनांनंतर सामनेवाला यांचे उत्पन्न नमुद केले आहे. तिच्या म्हणण्यानुसार, सामनेवाला क्र. १ यांची जुन्नर शहरात अमित किराणा जनरल स्टोअर्स व अमित जनरल स्टोअर्स अशी दोन मोठी दुकाने असून बुधवार पेठ जुन्नर येथे पिठाची गिरण आहे. सदर व्यवसायातून सामनेवाला यास वर्षाकाठी १५ ते २० लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला यांचा नारायणगाव येथे फ्लॅट असून त्याचे वर्षाला चार ते पाच लाख रुपये उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र. २ ते ४ हे सेवानिवृत्त असून त्यांना वर्षाकाठी १० ते १५ लाख रुपये पेंशन मिळते. त्यामुळे अन्नवस्त्र व औषधपाणी याकरीता एकूण रुपये २०,०००/— दरमहा अंतरिम पोटगी मंजुर करावी अशी अर्जदार हिने विनंती केली आहे.

**२७)** अर्जदाराचे वर नमुद कथने पाहता, अर्जदाराचे उदरनिर्वाहाची प्रथम व नैतिक जबाबदारी सामनेवाला क्र. १ याची असून अन्य सामनेवाला क्र. २ ते ४ यांची मालमत्ता व उत्पन्न याबाबी या ठिकाणी विचारात घेणे न्यायोचित ठरणार नाही. अर्जदारातर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, अर्जदाराने मुळ अर्जात नमुद केलेल्या सामनेवाला क्र. १ यांचे जनरल स्टोअर्स किंवा जुन्नर येथे असणा—या पिठाच्या गिरणीबाबत, तसेच त्यांचे नारायणगाव येथील फ्लॅट बाबत व त्यातून मिळणा—या उत्पन्नाबाबत केवळ तोंडी कथने केली असून त्या संदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी सादर केलेला नाही. तसेच अर्जदारतर्फे दाखल केलेले नि.क्र. २१ वरील मालमत्ता अथवा जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र पाहता कलम ७ मध्ये अर्जदार हिने तिचा सर्वसाधारण मासिक खर्च हा रकाना रिक्त सोडला असून सदर प्रतिज्ञापत्रावरुन अर्जदार हिचे मासिक खर्चाबाबत बोध होत नाही. त्याचप्रमाणे जाबदेणार याने नि.क्र. २२ वर स्वत:चे मालमत्ता व

जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्यामध्ये जाबदेणार क्र. १ याचे मासिक उत्पन्न र.रु. ३,५००/— इतके नमूद केल्याचे दिसून येते.

**२८)** या ठिकाणी अर्जदार ही कमवती असल्याचे किंवा तिच्या उत्पन्नाबाबत कोणतीही वस्तुस्थिती सामनेवालातर्फे पटलावर आणलेली नाही. याउलट, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह अद्याप अस्तित्वात असून अर्जदार ही सध्या तिचे माहेरी राहत असल्याचे तसेच सामनेवाला क्र. १ हा तिचे अन्नवस्त्र, औषधपाणी इ. बाबींची पुर्तत करत नसून अर्जदाराचा सांभाळ करत नसल्याचे स्पष्ट होते. त्यामळे अशा परिस्थितीत, जरी अर्जदारातर्फे सामनेवाला क्र. १ च्या उत्पन्नाबाबतचा ठोस पुरावा पटलावर सादर नसला तरी, पती शरीराने निरोगी व कमवता असल्यास पत्नीला सांभाळण्याची कायदेशीर जबाबदारी पतीवर निश्चित होते. त्यानुसार याठिकाणी अर्जदारास सांभाळण्याची जबाबदारी सामनेवाला क्र. १ याचेवर निश्चित होते.

**२९)** सामनेवाला क्र. १ याचे उत्पन्नाबाबत कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा सादर न करता अर्जदाराने तिचे अर्जात नमुद केलेली पोटगीची दरमहा रु. २०,०००/— इतक्या रक्कमेची मागणी अवास्तव व जास्तीची दिसून येते. त्याचप्रमाणे जाबदेणार यांचेतर्फे नि.क्र. २२ वरील प्रतिज्ञापत्रात नमूद केलेल्या उत्पन्नाबाबत देखील कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वर नमुद परिस्थिती विचारात घेवून अर्जदाराच्या दैनंदिन गरजा व सध्याची महागाईची परिस्थिती पाहता, सामनेवाला क्र. १ याने अर्जदारास दरमहा रु.३,०००/— अशी अंतरिम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल या निष्कर्षाप्रत येवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) प्रस्तुत अर्ज निशाणी ५ अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) सामनेवाला क्र. १ याने अर्जदारास अन्नवस्त्र व औषधपाणी याकरीता दरमहा रक्कम रू.३,०००/— (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) या दराने प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगी म्हणून मूळ अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत नियमितपणे दयावी.

३) आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांना विनामूल्य देण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

दिनांक — १०/१०/२०२२ (पी. व्ही. सपकाळ)
जुन्नर जि पुणे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जुन्नर

# शेरा

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी. व्ही. सपकाळ,<br>दिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जुन्नर |
| लघुलेखकाचे नाव | : | योगेश के. कोटस्थाने |
| निकाल तारीख | : | १०/१०/२०२२ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | १०/१०/२०२२ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | १०/१०/२०२२ |